## दिनांक १९.०१.२०२४ रोजी मा. मुख्य माहिती आयुक्त व मा. राज्य माहिती आयुक्त यांची सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या बैठकीचे इतिवृत्त.

१. श्री. समीर सहाय, मा. राज्य मुख्य माहिती आयुक्त व राज्य माहिती आयुक्त, बृहनमुंबई, पुणे, औरंगाबाद खंडपीठ.
२. श्री. राहूल पांडे, राज्य माहिती आयुक्त, नागपूर व अमरावती खंडपीठ.
३. श्री. भूपेंद्र गूरव, राज्य माहिती आयुक्त, कोकण व नाशिक खंडपीठ.
४. श्रीम. सविता जावळे, सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय.
५. श्रीम. रीना फणसेकर, उप सचिव, राज्य माहिती आयोग, कोकण खंडपीठ.
६. श्री. मनोज सांगळे, उप सचिव, राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ.
७. श्रीम. शिल्पा देशमुख, अवर सचिव, राज्य माहिती आयोग, मुख्यालय.
८. श्री. अभय भंडारी, कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, मुख्यालय.
९. श्री. संभाजी जाधव, कक्ष अधिकारी (कार्या-६), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. श्रीम. सीमा चोप्रा, विशेष अभियोक्ता, मा. उच्च न्यायालय, मुंबई.
११. श्री. स्वप्निल परब, विभाग प्रमुख, महा-आयटी, मुंबई.
१२. श्रीम. ईरीन, Sr. Director IT, NIC, मुंबई.

**१. दिनांक ०६.१०.२०२३ च्या इतिवृत्तास मान्यता देण्यात आली.**

**२. जनहित याचिका क्र. ३१४३/२०२० श्री. शैलेश गांधी व इतर विरुद्ध महाराष्ट्र राज्य माहिती आयोग व इतर या प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या दिनांक १३/१२/२०२३ रोजीच्या आदेशाच्या अनुषंगाने करावयाची कार्यवाही:-**

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ यांनी पारित आदेशाच्या अनुषंगाने विशेष अभियोक्ता श्रीम.सीमा चोपडा यांनी बैठकीच्या वेळी आयुक्तांना असे सूचित केले की, आदेशामध्ये मुख्य माहिती आयुक्तांनी पुढील सुनावणीच्या वेळी प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याकरीता उपाय योजनेबद्दल मा. उच्च न्यायालयास माहिती देणे आवश्यक आहे. याबद्दल नाशिक खंडपीठाचे आयुक्त श्री.भूपेंद्र गुरव यांनी काही मुद्दे मा.उच्च न्यायालयासमोर मांडण्यासाठी लेखी सूचना वैठकीच्या वेळी श्रीम. सीमा चोपडा यांना दिल्या. बैठकीमध्ये असा निर्णय घेण्यात आला की, सन २०२४ मध्ये प्राप्त होणाऱ्या प्रकरणांची सुनावणी प्रलंबित प्रकरणांसोबत घेण्याची कार्यवाही प्रत्येक खंडपीठामध्ये करण्यात येईल, जेणेकरुन आयोगात प्राप्त होणारी नवीन प्रकरणे प्रलंबित राहणार नाहीत. तसेच राज्य माहिती आयोग, पुणे व छत्रपती संभाजीनगर कार्यालयांतील जुनी प्रकरणे विशेष मोहिम राबवून निकाली काढण्याची कार्यवाही सुरु आहे. या संदर्भात प्रत्येक खात्यामध्ये

समन्वय अधिकाऱ्यांची नेमणूक करुन त्यांच्या मदतीने प्रलंबित प्रकरणांमध्ये लवकरात लवकर माहिती उपलब्ध होण्याची कारवाई विशेष मोहिम अंतर्गत राबविण्यात येत आहे.

**३. अपिलार्थींच्या मागणीनुसार प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी ऑनलाईन सुनावणी घ्यावी :-**

मा.सर्वोच्च न्यायालयाने द्वितीय अपिल प्रकरणांमध्ये हायब्रीड सुनावणीबद्दल निर्देश दिले आहेत. या धर्तीवर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुध्दा अपिलार्थींच्या मागणीप्रमाणे हायब्रीड पध्दतीने सुनावणी घेणे आवश्यक आहे असे आयुक्तांनी नमूद केले.

माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम २५ पोटकलम (५) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थींच्या मागणीप्रमाणे हायब्रीड सुनावणी घेण्यात यावी, अशी शिफारस मुख्य माहिती आयुक्तांतर्फे शासनाला करण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला.

**४. ऑनलाईन कम्प्लेंट पोर्टल :-**

मा.सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशाप्रमाणे तक्रारदार/अपिलार्थीने ऑनलाईन पध्दतीने त्यांचे अपील/तक्रार दाखल करण्याची सुविधा उपलब्ध करणे आवश्यक आहे. या संदर्भात मुख्यालय स्तरावर महाराष्ट्र शासनाच्या आय.टी. विभागाच्या महा-आयटी यांना पोर्टलमध्ये आवश्यक व्यवस्था करण्याबाबत सूचना दिल्या होत्या आणि त्या आधारावर माहिती आयोगाच्या पोर्टलवर द्वितीय अपील आणि तक्रार ऑनलाईन पध्दतीने दाखल करण्याची कार्यवाही महा-आयटीने केली आहे. सचिव, मुख्यालय यांनी बैठकीमध्ये सूचित केले की, अपिलार्थी / तक्रारदारांकडून ऑनलाईन पध्दतीने अपील आणि तक्रार मुख्यालयाला प्राप्त होत आहेत आणि त्यानंतर ती तक्रार/अपील संबंधित खंडपीठांकडे हस्तांतरीत केली जाते.

आयुक्तांनी बैठकीत सूचित केले की, महा-आयटीने अपील आणि तक्रार दाखल करताना संबंधित खंडपीठ यांच्याकडे सरळ अपील / तक्रार हस्तांतरीत करण्याची कार्यवाही व्हावी याची व्यवस्था करावी. तसेच तक्रार दाखल करताना खंडपीठनिहाय आणि विभागनिहाय तक्रार दाखल करण्याची व्यवस्था पोर्टलवर करावी. महा-आयटीने या सर्व व्यवस्थेबद्दल तातडीने कार्यवाही करण्याबद्दल सूचना देण्यात आल्या.

**५. महाराष्ट्र राज्य माहिती आयोगाचे संकेतस्थळ अद्ययावत करणे :-**

NIC चे प्रतिनिधी यांनी बैठकीमध्ये स्पष्ट केले की, भारत सरकारतर्फे स्थिर (Static) वेबसाईट तयार करण्याची कार्यवाही त्यांच्या स्तरावर सुरु आहे. त्या योजनेखाली मुख्य माहिती आयोग यांची सुध्दा एक स्टॅटिक वेबसाईट तयार करणे शक्य आहे. NIC यांनी महाराष्ट्र राज्य

मुख्य माहिती आयोग यांची स्टॅटिक वेबसाईट तसेच त्या वेबसाईटमध्ये ७ खंडपीठांची माहिती समाविष्ट करण्याबाबत बैठकीमध्ये NIC ला सूचना दिल्या. जेणेकरुन मुख्य माहिती आयुक्त यांची वेबसाईटच्या मुख्य पृष्ठावरुन संबंधित खंडपीठाचे मुख्य पृष्ठामध्ये स्टॅटिक माहिती प्राप्त करणे शक्य होईल. या शिवाय स्टॅटिक वेबसाईट पोर्टलवर तक्रार/द्वितीय अपील आणि अपील आदेश उपलब्ध करण्याबद्दल डायनॅमिक वेबपेज लींक करण्याची कार्यवाही सुध्दा NIC यांनी करावी. ते डायनामिक पेज सध्याच्या उपलब्ध पोर्टल पेजवरुन लिंक करुन स्टॅटिक पेजवरुन डायनामिक पेजवर हस्तांतरण करण्याची व्यवस्था NIC ने करणे मान्य केले आणि लवकरात लवकर ती वेबसाईट तयार करुन NIC तर्फे सर्व आयुक्तांसमोर त्याचे सादरीकरण करण्यात येईल.

६. **वार्षिक अहवाल (सन २०२३) ची माहिती सर्व खंडपीठांनी वेळेत सादर करण्याबाबत सूचना दिल्या.**

७. **कलम ४ अंतर्गत अतिरिक्त माहिती स्वयंप्रकटीकरण करण्याबाबत:-**

बैठकीमध्ये मुख्य माहिती आयुक्त यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २५ (५) नुसार मा. मुख्य सचिवांना खालीलप्रमाणे शिफारस करण्याच्या सूचना दिल्या.

१. कलम ४ च्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक विभागात नोडल अधिकारी नेमण्याबाबत.

२. तसेच कलम ४ अन्वये स्वयंप्रकटीकरण करण्याच्या मुद्यांमध्ये निविदा प्रक्रियेबाबतची माहिती निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कलम ८ (१) च्या तरतुदींच्या अधीन राहून प्रकट करण्याबाबत.

८. **सर्व खंडपीठांनी निधीची मागणी करत असताना शिल्लक निधी व निधी शिल्लक राहण्याची कारणे याबाबत विहित प्रपत्रामध्ये मागणी करण्याबाबत सचिव, राज्य मुख्य माहिती आयोग यांनी सूचना दिल्या.**

९. **सुनावणीसाठी निर्गमित करावयाचा नोटीस मसुदा, Data Entry Procedure, Scanning of Records, SMS Notices व सर्व खंडपीठांमधील अपील आदेशाचा मसुदा इ. बाबत सर्वसाधारण चर्चा व आय. टी. टीम, पुणे यांचे सादरीकरण:-**

i) सर्व खंडपीठांकडून प्राप्त झालेल्या नोटीसींच्या प्रारुपावरुन नाशिक खंडपीठाने मुख्यालयाच्या मान्यतेने एकच नोटीसीचे प्रारुप निश्चित करुन सर्व खंडपीठांना कळविण्यात यावे.

ii) मुख्यालय आणि खंडपीठ येथे अभिलेखांचे स्कॅनिंग आणि सुधारीत डेटा एन्ट्री करण्याबाबत :

पुणे खंडपीठातर्फे श्री.वैभव ढोके (आय.टी.प्रशिक्षित) (कंत्राटी कर्मचारी) यांनी खंडपीठातील अभिलेखांचे स्कॅनिंग, डेटा एन्ट्रीबद्दल सादरीकरण केले. त्या सादरीकरणामध्ये प्राप्त होणारी अपील/तक्रारी यांचे स्कॅनिंग करणे, फोल्डर तयार करणे आणि त्यानंतर ते फोल्डर संबंधित समन्वय अधिकारी, जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे वर्ग करुन त्यावर केलेल्या कार्यवाहीबद्दल पाठपुरावा करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या गुगल शीटबद्दल सादरीकरणाच्या वेळी सर्वांना सांगितले. त्या आधारावर बैठकीमध्ये निश्चित करण्यात आले की, श्री.वैभव ढोके यांनी प्रत्येक खंडपीठातील संबंधित व्यक्तींना प्रत्यक्ष योग्य ते प्रशिक्षण देण्याची कार्यवाही पुढील २-३ महिन्याच्या आत करावी. याशिवाय एन.आय.सी. च्या मदतीने SMS वरुन सुनावणीबद्दल नोटीस देणे तसेच आदेशाची प्रत देण्याबद्दलची कार्यवाही सुध्दा पुणे आणि छत्रपती संभाजीनगर खंडपीठामध्ये श्री.वैभव ढोके यांनी सुरु केलेली आहे. ही पध्दत सर्व खंडपीठांमध्ये सुरु करण्याबाबतच्या सूचना श्री.वैभव ढोके यांना देण्यात आल्या आहेत.

**१०.आयत्यावेळचे विषय :-**

**१. सामान्य प्रशासन विभाग (माहिती व तंत्रज्ञान) दिनांक २७/०९/२०२२ च्या शासन निर्णयानुसार मुख्यालय व सर्व खंडपीठांसाठी महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळाकडून (Maha-IT) तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याबाबत.**

बैठकीमध्ये आयुक्तांनी प्रत्येक खंडपीठामध्ये महाआयटीतर्फे तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करण्याबद्दल सूचित केले. महाआयटीचे प्रतिनिधी यांनी सूचित केले की, शासन निर्णय दि.२७.०९.२०२२ प्रमाणे महा-आयटीतर्फे ज्या तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्यांचे मासिक ठोक मानधन निश्चित करण्यात आले आहे. त्या आधारावर मुख्यालय आणि खंडपीठांमध्ये ज्या तांत्रिक मनुष्यबळाची आवश्यकता आहे त्याप्रमाणे कारवाई करणे आवश्यक आहे.

बैठकीमध्ये खालील प्रमाणे तांत्रिक मनुष्यबळ घेण्याबद्दलचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागाकडे देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.:-

| क्र. | पदनाम | मासिक ठोक मानधन | मुख्यालय मुंबई | कोकण | पुणे | नाशिक | औरंगाबाद | अमरावती | नागपूर | बृहन्मुंबई | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नेटवर्क / | ८२८७७/- | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ८ |

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | सिस्टीम इंजिनियर (अ.क्र.२५) किंवा डेस्कटॉप इंजिनियर (अ.क्र.२२) | ४७८९६/- | | | | | | | | | |
| २ | आयटी असिस्टंट | ३३६६०/- | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ९ |
| ३ | डेटा एन्ट्री ऑपरेटर | ३३६६०/- | २ | १ | १ | १ | १ | १ | १ | १ | ९ |
| एकुण | | | ५ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | ३ | २६ |

**२. मंत्रालयीन संवर्गाप्रमाणे राज्य माहिती आयोगात कार्यरत मंत्रालयीन संवर्गातील उप सचिव यांना पूर्ण दराने ठोकभत्ता मिळण्याबाबत:-**

राज्य माहिती आयोगात प्रतिनियुक्तीने असणारे मंत्रालयीन संवर्गातील उप सचिव यांना पूर्ण दराने ठोक भत्ता मिळण्याबाबत उप सचिवांची निवेदने प्राप्त असून त्यासंदर्भातील प्रस्ताव सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात यावा.

**३. राज्य माहिती आयोगातील कंत्राटी कर्मचारी मानधनवाढ:-**

राज्य माहिती आयोगातील कंत्राटी कमंचाऱ्यांचे मानधनवाढ करण्याबाबतचा प्रस्ताव यापुर्वी सामान्य प्रशासन विभागास पाठविण्यात आलेला असून त्यास अद्याप मान्यता देण्यात आलेली नाही. सदरबाबत सामान्य प्रशासन विभागास स्मरणपत्र पाठविण्यात यावे.

४. मुख्य माहिती आयोग, दिल्ली तर्फे माहिती आयोगातील द्वितीय अपील inward करणे व नोटीस issue करणे यासंदर्भात online कार्यवाही करण्याबाबत CIC तर्फे प्राप्त ॲप COMS च्या Source Code संदर्भात संचालक, NIC ने आवश्यक कार्यवाही करावी.

५. मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक ०९/१०/२०२३ च्या अनुषंगाने Hybrid सुनावणीसाठी आवश्यक असणारे Web based infrastructure व software यासाठीचे configuration, NIC तर्फे ७ दिवसांत मुख्य माहिती आयोग व सर्व खंडपीठांना उपलब्ध करुन देण्यात यावे. NIC तर्फे देण्यात आलेल्या configuration च्या आधारे मुख्यालय व सर्व खंडपीठांनी स्वतंत्र कक्ष उभारण्यासाठी नियमाप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

वरील मुद्यांवर चर्चा झाल्यानंतर मा. राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानून बैठक समाप्त झाली.

---------*---------*----------